# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.08.2024** **वार:शुक्रवार**

---

1. एकशे चाळीस कोटी भारतीय विकसित भारत घडवतील-स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेल्या भाषणातून पंतप्रधानांचा विश्वास
2. देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
4. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या 80 लाखांहून अधिक लाभार्थींच्या खात्यात पहिल्या दोन हप्त्यांचे पैसे जमा आणि
5. प्रथितयश डॉक्टर आणि लेखक शंतनू अभ्यंकर यांचं पुण्यात दीर्घ आजारानं निधन

**स्वातंत्र्यदिन-मोदी**

चाळीस कोटी भारतीयांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं; आता 140 कोटी भारतीय समृध्द आणि विकसित भारत घडवू शकतात, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकावल्यानंतर त्यांनी काल देशाला संबोधित केलं. पंतप्रधान मोदी यांनी सलग अकराव्यांदा लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषण केलं. ते म्हणाले.....

**आजादी के पूर्व 40 करोड़ देशवासियों ने वो जज्बा दिखाया, वो सामर्थ्य दिखाया, दुनिया की महा सत्ता को उखाड़ करके फेंक दिया था, गुलामी की जंजीरों को तोड़ दिया था। अगर 40 करोड़ आजादी के सपने को पूर्ण कर सकते हैं, 140 करोड़ मेरे परिवारजन अगर संकल्प ले करके चल पड़ते हैं, तो चुनौतियां कितनी भी क्यों न हों, हर चुनौती को पार करते हुए हम 2047 विकसित भारत का लक्ष्य प्राप्त कर सकते हैं।**

सर्व स्तरातील नागरिकांच्या कल्याणासाठी सरकार काम करत आहे; कुठलाही राजकीय फायदा न बघता राष्ट्र प्रथम ही भावना समोर ठेऊन सरकार काम करत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. पायाभूत सुविधा, बँकिंग, पर्यटन अशा विविध क्षेत्रातील योजनांचा त्यांनी लेखाजोखा मांडला. एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा अशी अपेक्षा मोदी यांनी व्यक्त केली. तसंच देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. याबाबत बोलताना ते म्हणाले......

**इस गंभीर विषय पर देश में चर्चा हो। जो कानून धर्म के आधार पर देश को बांटते है, जो उंच नीच का कारण बन जाते है, ऐसे कानुनों को आधुनिक समाज मे कोई स्थान नही हो सकता। अब समय की मांग है, की देश मे एक सेक्युलर सिविल कोड हो। हमने कम्युनल सिविल कोड मे पचहत्तर साल बिताये है। अब हमें सेक्युलर सिविल कोड की तरफ जाना होगा। और तब जा कर के देश मे धर्म के आधार पर जो भेदभाव हो रहे है, सामान्य नागरिक को जो दुरी महसूस होती है, उससे हमें मुक्ती मिलेगी।**

कोलकाता इथं झालेल्या महिला अत्याचाराच्या घटनेबाबत चिंता व्यक्त करून मोदी म्हणाले, की महिलांविरोधातील गुन्ह्यांचा लवकरात लवकर तपास होणं आवश्यक आहे; अमानुष कृत्य करणाऱ्यांना लवकरात लवकर कठोर शिक्षा होते हा विश्वास निर्माण व्हायला हवा.

**राज्य स्वातंत्र्यदिन**

राज्यातही सर्वत्र स्वातंत्र्यदिन काल उत्साहात साजरा झाला. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी पुण्यातल्या विधान भवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. मुंबईत विधानभवनात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. तर मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या कल्याणासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. विकसित भारत घडवण्यात महाराष्ट्राचं महत्त्वाचं योगदान असणार आहे, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

**विकसित भारत असं म्हणतो तेव्हा महाराष्ट्राचं योगदान यात खूप मोठं असणार आहे. हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आपल्या तशी धोरणं आखावी लागतील या दृष्टीनं आम्ही गेल्या दोन वर्षापासून अनेक महत्वाकांक्षी पावलं टाकलेली आहेत. राज्याची अर्थव्यवस्था पुन्हा पूर्वपदावर आण्याचं मोठं आव्हान, चॅलेंज आपल्यापुढं होतं आणि ते आपण सडगळ्यांनी मिळून समर्थपणे पेललेलं आहे.**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदन केलं. सामान्य माणसाच्या जीवनात परिर्वतन व्हावं यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

छत्रपती संभाजीनगर इथल्या विभागीय आयुक्त कार्यालयात पालक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. राज्याच्या सर्वच जिल्हा मुख्यालयांमध्ये संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री, अथवा वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून राज्यात अनेक उपक्रमही आयोजित करण्यात आले होते.

कोल्हापूर जिल्ह्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 च्या पथदर्शी प्रकल्पाचा प्रारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून करण्यात आला. शासनाच्या विविध सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं काम या पथदर्शी प्रकल्पाद्वारे होईल; राज्यातील इतर जिल्ह्यातही हा प्रकल्प राबवला जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

ठाणे महानगरपालिका, महाराष्ट्र वन विभाग, ग्रीन यात्रा आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांनी 'मुख्यमंत्री हरित ठाणे एक लक्ष वृक्ष लागवड' या अभियानांतर्गत राबवलेल्या 'एक पेड माँ के नाम' या अभियानाचा प्रारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात झाला. नागपूरमध्ये कोराडी इथं तालुका क्रीडा संकुल सुविधांचं लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं; तसंच तिरंगा फेरीलाही फडणवीस यांनी रवाना केलं.

पुणे महानगरपालिकेनं सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल चौकात उभारलेल्या नवीन उड्डाणपुलाच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालं. या उड्डाणपुलाच्या दुसऱ्या टप्प्याचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं. नाशिकमध्ये पालक मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते; तर अमरावतीमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते रानभाजी महोत्सवाचं उद्घाटन झालं.

रत्नागिरीत पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते जिल्ह्यातल्या चार महिला प्रभाग संघांना पर्यटनासाठी बस उपलब्ध करून देण्यात आल्या. पर्यटन व्यवसायाला चालना देण्याबरोबरच महिलांना उपजीविकेचं साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं राबवलेला राज्यातला हा पहिलाच उपक्रम असल्याचं सामंत यांनी सांगितलं. रत्नागिरी तालुक्यातल्या पावसजवळच्या गोळप गावात उभारलेल्या एक मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचं लोकार्पणही उदय सामंत यांच्या हस्ते काल झालं.

**<u>विविध उपक्रम</u>**

स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, तसंच स्वयंसेवी संस्था संघटनांनीही काल रक्तदान, आरोग्य शिबीरं, देशभक्तीपर गीत गायन, सांस्कृतिक कार्यक्रम असे अनेक उपक्रम राबवले. पुणे जिल्ह्यातील जुन्नर इथल्या शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशनच्या पाच गिर्यारोहकांच्या पथकानं काल लदाखमधील कांगयात्से 2 या शिखरावर यशस्वी चढाई करून तिरंगा फडकवला आणि राष्ट्रगीत गायलं. निलेश खोकराळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या मोहिमेत विकास सहाणे, किशोर साळवी, अरूण रासकर आणि संतोष डुकरे या गिर्यारोहकांचा समावेश होता. हिमालयाच्या झंस्कार पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखरांपैकी एक असलेलं कांगयात्से 2 हे शिखर गिर्यारोहकांसाठी नेहमीच एक आव्हान ठरलं आहे.

**<u>लाडकी बहीण</u>**

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांची एकत्रित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरूवात झाली आहे. कालपर्यंत सुमारे 80 लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले आहेत. या योजनेच्या लाभार्थींशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दूरस्थ माध्यमातून प्रातिनिधिक स्वरूपात संवाद साधला. मुख्यमंत्र्यांची बहीण अशी आपली नवीन ओळख आता निर्माण झाली असून रक्षाबंधनापूर्वीच ओवाळणी मिळाली असल्याचं सांगत लाभार्थी महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तर राज्यातील लाखो भगिनींच्या आशीर्वादाचं बळ आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. ही योजना केवळ निवडणुकीपुरती नाही; ती कायम आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

दरम्यान, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी 1 कोटी 62 लाखापेक्षा अधिक महिलांची नोंदणी झाली असून उर्वरित पात्र महिलांना उद्या म्हणजे 17 ऑगस्टपर्यंत हा लाभ मिळणार आहे, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल दिली. या योजनेतील पात्र महिला लाभार्थ्यांना लाभ वाटपाचा राज्यस्तरीय औपचारिक प्रारंभ उद्या पुण्यात होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यातील विधान भवन इथं घेतला. या कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या महिलांना आवश्यक त्या सर्व सोईसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना पवार यांनी यावेळी दिल्या.

**<u>वाजपेयी स्मृतीदिन</u>**

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त नवी दिल्लीतल्या 'सदैव अटल' या त्यांच्या समाधी स्थळाजवळ आज प्रार्थना सभेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>नवरोज</u>**

देशभरात काल नवरोज उत्साहात साजरा करण्यात आला. पारशी बांधवानी अग्यारीत जाऊन नवरोजनिमित्त प्रार्थना केली आणि सर्वांना शुभेच्छा दिल्या.

**<u>अटक</u>**

लष्करात नोकरी देतो असं सांगून नागरिकांकडून पैसे उकळत असल्याच्या आरोपावरून विजय बिष्ट याला अटक करण्यात आली असल्याची माहिती लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील गुप्तचर विभागाने दिली आहे. बिष्ट याला अहमदनगरमधून अटक करण्यात आली. प्रत्येक उमेदवाराकडून 2 लाख रुपये असे 8 लाख रुपये त्याने उकळले असल्याचं गुप्तचर विभागाने म्हटलं आहे.

**<u>अभ्यंकर निधन</u>**

प्रथितयश डॉक्टर आणि प्रसिद्ध लेखक, वक्ते, नाट्यकर्मी डॉक्टर शंतनू अभ्यंकर यांचं काल पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. ते 60 वर्षांचे होते. स्त्री आरोग्य क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना राज्य शासनानं डॉक्टर आनंदीबाई जोशी पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. आधुनिक वैद्यकीची शोधगाथा, शास्त्रज्ञ आजीच्या गोष्टी यांसारखी पुस्तकं, अनुवाद, वर्तमानपत्र आणि विविध नियतकालिकांतून स्तंभ लेखन, ब्लॉग आदी माध्यमातून त्यांनी आरोग्य आणि विज्ञान विषयक विपुल साहित्य निर्मिती केली. सातारा जिल्ह्यातील वाई इथल्या प्राज्ञ पाठशाळा मंडळाचे विश्वस्त आणि नवभारत मासिकाच्या संपादक मंडळाचे ते सदस्य होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल सातारा जिल्ह्यातल्या वाई इथं अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या 24 तासात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.